ISSN - 2320-1436

# IDEAL CRITICISM

AN INTERNATIONAL MULTI-LINGUAL & MULTI-SUBJECT RESEARCH JOURNAL

**Vol-1 Issue -4 April. 2013**

CHIEF PATRONS

**Ramvilas Paswan**, MP, New Delhi, India

**Dr. Ranjeet Ghandi**, Secretary, APDJP, Solapur (MS)

ADVISORY BOARD

**Dr. Bhalchandra Mungekar,** MP & Ex. Member of Planning Comission of India

**Dr. Narendra Jadhav,** Member of Planning Comission of India

**Dr. Janardhan Waghmare,** MP & Ex. Vice-Chancellor, SRTMU, Nanded (MS)

**Dr. N.N. Maldar,** Vice-Chancellor, Solapur University, Solapur

**Dr. Bhimashankar Bhanje** B.C.U.D. Solapur University (MS)

**Dr. S. Chandra,** New Delhi, India

**Dr. Ajit Manikshette**, Principal, WCAS, Solapur (MS)

EDITORIAL BOARD

Prin. Dr. Rajendra Shendge

Dr. Jaishri Shinde

Dr. Shrikant

Dr.D.G. Gatade

Dr. P.D.Sabale

Kamal Tambake

Prin. Suresh Pawar

REFEREE BOARD

Jyoti Waghmare (English)

Dr. Ashok Marde (Hindi)

N.P. Bansode (Marathi)

Dr. B.B. Pujari (Kannada)

Dr. G.A. Shaikh (Urdu)

C.D. Kamble (Sociology)

Dr. S. N. Salawade (Political Science)

Vijaya Mahajan (MSW)

Dr. B.L. Chawan (E. Science)

REPRESENTATIVES

S.S. Kolle – Nanded

Harde - Sangola

# IDEAL CRITICISM

AN INTERNATIONAL MULTI-LINGUAL & MULTI-SUBJECT RESEARCH JOURNAL

Vol-1 Issue -4 April. 2013 ISSN 2320-1436


## महिलांवरील अत्याचार


**प्रा. श्रीमती देसाई एम्. बी.**

सहयोगी प्राध्यापक, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर


आज भारतीय स्वातंत्र्याला ६५ वर्षे उलटून गेली तरी देखील समाजात स्त्रीबाबत समानतेचा दृष्टिकोन अपेक्षेप्रमाणे विकसित होऊ शकला नाही ही खेदाची बाब आहे. स्त्री च्या पूर्वीच्या परिस्थितीत आज बदल झालेले असले तरीही स्त्री अजूनही खऱ्या अर्थाने पुरुषांच्या बरोबरीला आलेली नाही. आधुनिक स्त्रीला सर्व प्रकारच्या संघर्षातूनच वाटचाल करावी लागते. स्त्री म्हणजे सृजनशील, सामर्थ्य आणि करुणाजन्य शक्ती होय. पण या शक्तीचा २१ व्या शतकात देखील छळ होताना दिसत आहे. घराची आर्थिक बाजू सांभाळताना तिला घर सांभाळून नोकरी करताना तारेवरची कसरत करावी लागते. आजही स्त्रीचा जन्म आनंदाने स्विकारला जात नाही. आईच्या गर्भातही ती सुरक्षित नाही. निर्णय प्रक्रियेत स्त्रीला फारसे महत्त्वाचे स्थान दिले जात नाही. तिच्या श्रमाची गणना उत्पादक श्रमामध्ये होत नाही. देशातील विविध वृत्तपत्रे व चित्रवाहिन्या पाहिल्यास स्त्रीभ्रूण हत्या प्रकरणे, स्त्रियांवरील अत्याचाराची उदाहरणे मोठया प्रमाणात पाहावयास मिळतात. आजही 'हुंडाबळी' सारखे गुन्हे दिसून येतात. कायद्याने जरी स्त्री-पुरुष समानता असली तरी त्याची अंमलबजावणी होत नाही किंवा अजूनही स्त्रियांच्या मनावरील रुढी, प्रथा, परंपरा, धर्माचा पगडा असल्यामुळे स्त्रियांच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा स्त्रिया वापर करुन घेत नाहीत. आज तर भांडवलशाहीमध्ये स्त्रियांच्या सौंदर्याचाही बाजार मांडला जात आहे. शोषण चालूच आहे. फक्त शोषणाचे संदर्भ, शोषणाची साधनं बदलली आहेत. शोषण करण्याची प्रक्रिया बदलली आहे. बाकी सारं तेच आहे. प्रसार माध्यमातून प्रसारित होणाऱ्या बातम्यांमधून देखील स्त्रीची विकृत प्रतिमा सतत रंगवली जाते. एकूणच काय तर स्त्री, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांच्या भावना, स्त्रीचं माणूस म्हणून जगणं आज धोक्यात आल्याचं पावलापावलागणिक आपणास जाणवते आहे. स्वत:शी करावा लागणारा संघर्ष, स्वत:च्या कुटुंबाबरोबर करावा लागणारा संघर्ष सभोवतालच्या समाजाशी करावा लागणारा संघर्ष, देशाशी करावा लागणारा संघर्ष एकूणच काय जन्मल्यापासून मरेपर्यंत स्वत:ला सिध्द करण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही भारतातील स्त्रियांची सत्य अशी कैफियत आहे.

या परिस्थितीचा विचार करता महिलांचे सक्षमीकरण व स्त्रियांविषयी समाजाची मानसिकता बदलणे ही एक काळाची गरज आहे. देशाच्या जडणघडणीमध्ये व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात स्त्रियाचा वाटा फार महत्त्वाचा आहे. आजच्या स्त्री ने जुनाट, खुळचट प्रतिमा पुसून टाकून नवीन स्वतंत्र समतेचा पुरस्कार करणारी नवीन प्रक्रिया उभा केली पाहिजे. समाजाने स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल केला तर निश्चितच स्त्रियांना योग्य प्रकारे न्याय मिळेल व एक स्वाभिमानी स्त्री म्हणून या जगात वावरता येईल. जोपर्यंत स्त्री-पुरुषांमध्ये समानतेच्या पातळीवर व्यवहार होणार नाहीत, तोपर्यंत समतावादी, समाजवादी समाजजीवन निर्माण होणार नाही. जनमानसात स्त्री-पुरुष समतेची जाणीव निर्माण करण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतील. साऱ्या समाजातील माणसांचं जाणिवेच्या पातळीवर नव्याने समाजीकरण करावं लागेल. तरच खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याची पहाट उगवेल.

**प्रास्ताविक -**

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे असं म्हटलं जातं. याचा अर्थ भारताच्या संस्कृतीमध्ये महिलांपेक्षा पुरुषांना जास्त महत्त्व दिलं गेलं आहे हे अनादिकालापासून चालत आलेलं आहे आणि अजूनही तेच चित्र दिसत आहे. वंशसातत्य व वंशविस्ताराच्या दृष्टीने निसर्गाने स्त्री व पुरुष असे मानव निर्माण केले आहेत. वास्तविक पाहता लिंग असमानतेशिवाय या दोहोंमध्ये काहीच फरक नाही. मात्र काळाच्या ओघात स्त्रीकडे दुय्यमत्व येत गेले आणि पुढे या ना त्या नात्याने सतत पुरुषावर अवलंबून राहणारी असे भासवून पुरुषसत्ताक समाजाने तिला अबला ठरविले व तिच्यावर अत्याचार सुरु झाले. खरं तर प्रत्येक पुरुषाचं जीवन हे स्त्रीशिवाय अपूर्ण आहे हे प्रत्येक पुरुषजातीला माहित असूनही जणू हे सत्य ते स्विकारायला तयारच नाहीत.

आज २१व्या शतकातही स्त्री जीवनाची होणारी शोकांतिका उघडया डोळयांनी पाहावी लागत आहे. त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बेकारी, महागाई, शिक्षण, सामाजिक अन्याय, अत्याचार, आर्थिक दुर्बलता तसेच श्रमिक वर्गातल्या कामगार, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, मध्यमवर्गीय नोकरदार, दलित, उपेक्षित मागासवर्गीय, घरेलू कामगार, गिरणी कामगार अशा संघटीत व असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या सगळया स्त्रियांना आजही पैशापासून आरोग्यापर्यंत आणि मारझोडीपासून हुंडाबळीपर्यंत अनेक अत्याचारांना सामोरं जावं लागत आहे. मुलगा जर वंशाचा दिवा मानला जात असेल तर मुलगी ही त्या दिव्याची ज्योत आहे. दोन्ही घरे प्रकाशमय करण्याची ताकद या स्त्री ज्योतीमध्येच आहे हे जाणीवपूर्वक विसरले जाते.

आपण जर पुरुषप्रधान संस्कृतीच्या उतरंडीचा विचार केला तर या उतरंडीत सर्वात खालचे स्थान स्त्रीच्या वाटयाला जाते. म. फुले यांनी स्त्रियांना ज्ञानाचा प्रकाश दाखवला आणि तो प्रकाश कायमस्वरुपी तेवत राहावा यासाठी सावित्रीबाईंनी आयुष्याची ५० वर्षे खर्ची केली. तरी सुध्दा स्त्री चे अस्तित्व आज २१व्या शतकातही कमीच वाटते. एक आदर्श पत्नी , एक आदर्श माता, एक आदर्श सून, एक आदर्श सासू अशा नानाविध भूमिका पार पाडताना स्त्री जीवनाचे नाटक हे कारुण्यमय होते. ज्या स्वराज्यात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नाही ते स्वराज्यच नव्हे. आज

देशामध्ये कोणतीही घटना घडो, त्याचा सर्वात वाईट परिणाम पहिल्यांदा स्त्री वर्गावरती होतो. आज स्त्रियांना योग्य प्रकारचे शिक्षण नाही, त्यांच्या आरोग्याचा प्रश्न मोठया प्रमाणात वाढला आहे. ग्रामीण व दलित महिलांना तर मोठया प्रमाणात वेगवेगळया आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. इथल्या लोकशाही देशात सर्वांना समान मत राज्यघटनेमुळे मिळाले आहे. पण सर्वांना समान 'पत' मात्र या लोकशाही देशाने दिलेली नाही. प्रत्येकाच्या मनामध्ये स्त्री-पुरुषामधील भिन्नता, स्त्री कमजोर आहे, ती दुबळी आहे अशा प्रकारची मते मोठया प्रमाणात भिनवली आहेत. खुद्द स्त्रिया देखील आज या खोटया विचाराच्या बळी पडल्या आहेत.

आज या विषमतेच्या चौकटीत साखळदंडाने बांधलेल्या स्त्रीला मुक्त करण्याची गरज आहे आणि हे करण्याची ताकद केवळ स्त्रीमध्येच आहे. जोपर्यंत महिला पुढे येत नाहीत तोपर्यंत समाजाचे, राष्ट्राचे कल्याण होणार नाही हे महात्मा गांधींचे उद्‌गार योग्यच आहेत. डॉ. वसंत गोवारीकर म्हणतात, "स्त्रियांच्या हाती सत्ता दिली, सगळा कारभार सोपवला तर देश महासत्ता होण्यासस वेळ लागणार नाही."

**शोधनिबंधाची उद्दिष्टये -**

प्रस्तुत शोधनिबंध पुढील उद्दिष्टांनी लिहिण्यात आला आहे.

१. महिलांवरील अत्याचाराचे स्वरुप समजावून घेणे.

२. महिलांवरील अत्याचाराची कारणे शोधणे.

३. महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी उपाय सुचविणे.

**शोधनिबंधाची विभागणी -**

या शोधनिबंधाची विभागणी तीन विभागात करण्यात आली आहे. पहिल्या विभागात महिलांवरील अत्याचाराचे स्वरुप स्पष्ट केले आहे. दुसऱ्या भागात महिलांवरील अत्याचाराची कारणे विषद केली आहेत व तिसऱ्या भागात महिलांवरील अत्याचार कमी करण्यासाठी उपाय सुचविले आहेत.

**अभ्यासपध्दती -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. ही सामग्री स्त्रियांच्या संदर्भातील विविध पुस्तके, मासिके, वृत्तपत्रामधील लेख इ. चा वापर करुन गोळा केली आहे.

**महिलावरील अत्याचाराचे स्वरुप -**

आंतरराष्ट्रीय आर्थिक अनुसंधानाने जगभराच्या १३० देशातील स्त्रियांच्या विकासाचे सर्वेक्षण केल्यानंतर भारताला त्यात ११३ वा क्रमांक दिला आहे. स्त्रियांना समान व सन्मानाचे स्थान देणाऱ्या देशामध्ये पहिल्या क्रमाकांचा देश नॉर्वे हा असून त्यापाठोपाठ स्वीडन व डेन्मार्क या स्कँडेनेव्हियन देशांचा समावेश आहे. अर्थव्यवहारातील सहभाग, आरोग्य, जीवनाची हमी आणि राजकीय अधिकार या कसोटयांवर सर्वेक्षण करणाऱ्या या अनुसंधानाने भारतातल्या स्त्रियांना देण्यात आलेल्या राजकीय अधिकारांबाबतच काही गुण दिले आहेत. मात्र ही गोष्ट वगळली तर अन्य सर्व क्षेत्रांत आपण आपली स्त्री फार मागे राहील याची काळजी घेतली असल्याचे या सर्वेक्षणाने दाखवून दिले आहे. स्त्रियाचे आरोग्य व जीवित रक्षण याबाबत भारताचा १२८ वा क्रमांक असून बालमृत्युच्या वाढत्या प्रमाणाने भारताला थेट अपराध्याच्या पातळीवर नेऊन बसवले आहे. भारतात होणाऱ्या दर १ लक्ष जन्मामागे मृत्यु पावणाऱ्या मुलींची संख्या ४५० एवढी असून तो या संदर्भातील जगातला सर्वात मोठा आकडा आहे.

महाराष्ट्रसारख्या प्रगत राज्यातही स्त्रीभ्रूण हत्येचे प्रकार राजरोसपणे सुरु असल्यामुळे दर हजारी स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे. महाराष्ट्र राज्य स्त्रीविरोधी गुन्हयात पहिल्या क्रमांकावर आहे. १४.३% गुन्हे दर ३३ मिनिटांनी महाराष्ट्रात घडत आहेत. बालिकांवर होणारे ११.३% बलात्कार व ७७.३% वेश्या व्यवसायासाठी लहान मुलींची विक्री महाराष्ट्रात होत आहे हे केवळ नोंदविलेले गुन्हे आहेत. किती तरी गुन्हे नोंदविलेच जात नाहीत. बालविवाहाला बंदी घालणारे कायदे देशात असताना राज्यभरात दरवर्षी लाखोंनी असे विवाह होत असल्याचे चित्र आहे. शिक्षणात मुलींचे यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक असूनही त्यांच्यातील अन्याय-अत्याचार व हुंडाबळीचे प्रमाण कमी झालेले नाही. महिलांविषयक गुन्हयांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊनच राज्यभरातील पोलिस आयुक्तालयांना महिला सहाय्य कक्षाची स्वतंत्रपणे स्थापना करावी लागते ही काही अभिमानास्पद बाब नाही. सांस्कृतिक व समाजसेवेच्या क्षेत्रात महिलांनी उच्च स्थान मिळविले असले तरी धार्मिक क्षेत्रात त्यांना सर्वोच्च स्थानापासून अजून दूरच ठेवण्यात आलेले आहे. महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात अद्याप व्हावा तसा बदल झालेला नाही एवढाच याचा अर्थ आहे. आपण आपल्या स्त्रियांना फारसे चांगले वागवत नाही, त्यांची पुरेशी काळजी घेत नाही आणि त्यांचा योग्य तो सन्मानही राखत नाही हेच यावरुन सिध्द होते.

कायद्याने बदलता येईल असे हे चित्र नाही. त्यासाठी खऱ्याखुऱ्या मानसिक परिवर्तनाचीच गरज आहे. आर्थिक सुबत्ता आली की तिच्यासोबत सांस्कृतिक संपन्नता येते हेही आपल्यातील एक चुकीचं समीकरण आहे. ओरिसा आणि बिहार राज्यात स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण तेथील दारिद्र्यामुळे मोठे आहे असे मानले तर पंजाब व हरियाणा ही देशातील सर्वाधिक संपन्न राज्ये असूनही जन्माला येऊ घातलेल्या मुलीना ठार मारणारी सर्वाधिक गुन्हेगार राज्ये असाही त्यांचा नावलौकिक आहे. संपन्नता आणि संस्कृती यांचा संबंध पार संशयास्पद करुन टाकणारे हे दुर्दैवी वास्तव आहे.

**स्त्रियांवरील अत्याचाराची कारणे -**

आजपर्यंत स्त्री च्या वेदना केवळ स्त्रीच्याच राहिलेल्या आहेत. स्त्रियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांचे मूळ कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर त्याचे उत्तर आजची समाज व्यवस्था हेच सापडेल आणि त्यातही खोलवर जाऊन विचार केला तर या समाजव्यवस्थेतील कुटुंबव्यवस्था हेच कारण सापडेल.

स्त्रियांवरील अत्याचाराची पुढील कारणे सांगता येतील -

**१. लिंग आधारित श्रमविभागणी -**

कुटुंबातील मुख्य कर्ता पुरुष किंवा इतर पुरुष सभासदांचे श्रम हे आर्थिक कुटुंबाबाहेर जोडले जाऊन कुटुंबातील आई, बहिण, पत्नी म्हणून मुलांचे संगोपन, स्वयंपाक, घरगुती कामाशी तिला जोडले जाते. पुरुषप्रधान व्यवस्थेत कुटुंबातील कामाचे मोल नसल्याने आर्थिकदृष्टया ती पुरुषावर अवलंबून राहते. कुटुंबातील चार भिंतीतच तिचे विश्व दडपल्याने तिच्या अधिकाराची जाणीव तिला होत नाही. बऱ्याचदा स्त्रीया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्या तरीही पुरुषप्रधान व्यवस्थेत तिच्या श्रमावर, वेतनावर पुरुषांचाच अधिकार असतो. घटनेने दिलेले हक्क रुढीने बनविलेली मनोवृत्ती आणि प्रत्यक्ष भोवती असणारी परिस्थिती या सर्वांचा आपसात विरोध असल्याने स्त्री-पुरुषांतील बेदिली बोलकी होऊ लागली आहे.

**२. कुटुंबातील सत्तासंबंध -**

पुरुषप्रधान कुटुंबरचना मुळातच असमान तत्वावर आधारित असल्याने कुटुंबात स्त्रीला समान संधी, समान दर्जा नसतो. कुटुंबात पुरुष उच्च स्थानी असतो. तो अधिकाराने मोठा असतो व आपले निर्णय दुय्यम स्थान दिलेल्या घरातील स्त्रीवर लादतो.

**३. कुटुंबाची पारंपारिक चौकट -**

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांभोवती अनेक पारंपारिक चौकटी निर्माण केल्या गेल्या आहेत. 'पतिव्रता स्त्री' , 'आदर्श माता', 'आदर्श गृहिणी' यांचे जाळे निर्माण करुन सासुरवास सहन करावा. नवऱ्याच्या जाचापुढे अधिक सहनशिलतेने वागावे हे गृहित धरले जाते व तिला आदर्श स्त्री असे संबोधिले जाते. यातूनच प्रत्येक स्त्री ने नवऱ्याप्रती स्त्री धर्म पाळावा अशा पारंपारिक चौकटी निर्माण केल्या आहेत.

**४. पतीची व्यसनाधिनता -**

पतीच्या व्यसनाधिनतेमुळे विशेषतः दारुमुळे किंवा स्त्रीने कष्टाने मिळविलेले पैसे नवऱ्याला दारु व जुगारासाठी न दिल्याने स्त्रीवर अत्याचार होत राहतो.

**५. मुलगा-मुलगी भेद -**

अजूनही कुटुंबात आणि समाजात मुलगा-मुलगी असा भेद केला जातो. मुलांसाठी वेगळे नियम व मुलींसाठी वेगळे नियम, बंधने दिसून येतात. मुलगी झाल्यास स्त्रीलाच दोषी ठरवून तिला त्रास दिला जातो. मुलगा होईपर्यंत मुलीची संख्या वाढवून तसेच अलिकडे स्त्रीभ्रूण हत्या करुन स्त्रीच्या शरीरावर अत्याचारच केला जातो. कळी उमलण्याआधीच तिचा जगण्याचा हक्क नाकारला जातो.

**६. हुंडयाची प्रथा -**

समाजात अजूनही हुंडा देणे व हुंडा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. हुंडा देणे व घेणे यावर कायद्याने बंदी आहे. तरी देखील कोणत्याही स्वरुपात ही प्रथा सुरु आहे. यातूनच आज 'हुंडाबळी' सारखे गुन्हे दिसून येतात. वर्तमानपत्रात रोज किमान एक तरी घटना स्त्री अत्याचाराची असते. तिला कधी हुंडयासाठी छळले जाते तर कधी तिला रॉकेल टाकून जाळले जाते. शिवाय लग्नात आहेर कमी आले तर तिला आयुष्यभर टोचून बोलले जाते. तिचा शारीरिक, मानसिक छळ केला जातो.

**७. असुरक्षित समाजव्यवस्था -**

घरात स्त्री सुरक्षित नसतेच. तसेच समाजात वावरतानाही ती असुरक्षित असते. नोकरी व्यवसायात, शेतावर, बांधकामावरही ती सुरक्षित नसते. अशा ठिकाणीही तिच्यावर विविध प्रकारे अत्याचार केला जातो.

थोडक्यात, स्त्रियांवरील अत्याचाराची अशी विविध कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक कारणे दिसून येतात.

**स्त्रियांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी सुचविलेले उपाय -**

स्त्रियांवरील अत्याचाराची वरील विविध कारणे पाहिल्यास ते कमी होण्यासाठी स्त्रियांविषयी समाजाची मानसिकता बदलणे ही काळाची अत्यावश्यक गरज आहे. यासाठी पुढील उपाय सुचविता येतील.

**१. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल -**

सामान्यपणे स्त्रियांचा उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पारंपारिक म्हणजे पदवी मिळवणे हाच आहे. आज बदलत्या परिस्थितीनुसार त्यात बदल केला पाहिजे. आज पदवी शिक्षणाबरोबरच उपयोजित स्वरुपाचे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणे गरजेचे आहे. असे शिक्षण स्त्रियांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण करु शकते.

**२. स्त्री सुरक्षिततेच्या नियमांची तरतूद व अंमलबजावणी -**

स्त्रियांवर शाळेत, कॉलेजमध्ये, नोकरीवर जाताना व नोकरीच्या ठिकाणी अत्याचार होतात. त्यामुळे त्यांच्यात भितीची, असुरक्षिततेची भावना निर्माण होते. शासनाने स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची दखल घेऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे. याशिवाय विवाह कायदा (१९५५), हिंदू वारसा कायदा (१९५५), घटस्फोट प्रतिबंधक कायदा (१९६१) या कायद्यात सुधारणा झाल्या पाहिजेत.

**३. पालक व समाज यांच्यात जागरुकता निर्माण करणे -**

आपल्या पुरुषप्रधान समाजात मुलीच्या शिक्षणाचा उपयोग माहेरच्या कुटुंबाना होत नाही. पालकांचा म्हातारपणी सांभाळ करण्याची क्षमता / जबावदारी फक्त मुलाचीच असते या मानसिकतेला वैचारिक व भावनिक क्रांतीतून तडा देऊन स्त्री-शिक्षणाचा म्हणजेच महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला गेला पाहिजे.

**४. उच्च शिक्षणात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी उपाय -**

उच्च शिक्षणात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प दिसून येतो. यासाठी शासनाने उच्च शिक्षणात कार्यक्षम योजनाद्वारे स्त्रियांचा सहभाग वाढविला पाहिजे. त्यासाठी शिष्यवृत्त्या, कमी खर्चात किंवा मोफत शिक्षण, मोफत वसतीगृहे, शिक्षणानंतर नोकरी मिळवून देण्याची शाश्वती यासारख्या योजनांद्वारे स्त्रियांचा उच्च शिक्षणाला प्रोत्साहन दिले पाहिजे.

**५. स्त्री-शिक्षणात आधुनिक शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी -**

स्त्रियांच्या शिक्षणात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांना सामोरे जाण्याची क्षमता, कौशल्य देणारे शिक्षण असणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचे आधुनिकीकरण करुन संगणक, माहिती, तंत्रज्ञान, संप्रेषण क्षेत्र, व्यवस्थापन याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. या आधुनिक शिक्षणामुळे स्त्रियांना नोकरीच्या निरनिराळया संधी उपलब्ध होतील.

**६. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमांवर भर -**

स्त्रियांच्या सर्वांगिण विकासात स्त्रियांचे व्यक्तिमत्त्व हा एक महत्त्वाचा घटक आहे. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्राथमिक, माध्यमिक स्तरापासूनच औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. स्त्रियांची उदासिनता हे त्यांच्या अपयशाचे गमक आहे. यासाठी स्त्री संघटनांची संख्या वाढली पाहिजे. स्त्रियांसाठी व्याख्याने, चर्चासत्रे, कृतीसत्रे यांचे आयोजन कार्यक्षमरित्या झाले पाहिजे. यामुळे स्त्रिया स्वयंपूर्ण होऊन शिक्षणातील व जीवनातील समस्यांना त्या समर्थपणे तोंड देऊ शकतील.

थोडक्यात, स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून नियोजन, स्त्री सक्षमीकरणासाठी निधी, स्वयंसाहाय्य गटामार्फत आर्थिक विकास व सक्षमीकरण, सुरक्षा व संरक्षणविषयक तरतूद, महिलाच्या मालमत्ता हक्काची जोपासना, आपद्ग्रस्त महिलांचे पुनर्वसन, स्वयंसेवी संघटनांचे प्रयत्न, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचा यंत्रणेचा महिला सबलीकरणासाठी वापर, व्यक्ती, समाज, शासन याचा स्त्री-शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व व्यापक दृष्टिकोन, समाजाच्या मानसिकतेत बदल इ. मुळे स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण निदान काही अंशी तरी कमी होईल.

**संदर्भ ग्रंथ -**

**A) पुस्तके -**

१. Desai Neera and Thakkar Usha, "Women in Indian Society", National Book Trust India (2001).
२. चाळके शोभा (संपादक), 'भारतीय स्त्रियांचे स्वातंत्र्य'? निर्मिती विचारमंच, कोल्हापूर (२०१०)
३. Mahapatra Subhasini, 'Development of Women Challenges and Response, Rajat Publications, New Delhi (2006)
४. Sen Bimla, "Role of Women in Notion Building", Abhishek Publication, Chandigarh (2007)
५. Soni Balhir, "Empowerment of Women Workers, the unorganized Sector", A.S. Saini for dominant publisher, Delhi (2007).

**B) मासिके -**

१. सांवर दिपाली, 'स्त्रियांवरील कोटुंबिक हिंसाचार व कायदा', मुक्तिवेध स्त्री विशेषांक, पुणे (डिसेंबर २००६)
२. संपकाळ दत्तात्रय, "महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण"
शिक्षण संक्रमण, अंक १० (मार्च २०१२)